www.gauravprakashan.com

# गौरव प्रकाशन

कार्यकारी संपादक : गौरव धवणे

RNI NO. MAHMAR/2010/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १७ ◆ अंक १२ ◆ अमरावती ◆ गुरूवार, दि. २ ते ८ जुलै २०२६ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com

## 'अ‍ॅट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा : मुख्यमंत्री

मुंबई : अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात ' अ‍ॅट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.बैठकीस खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते.

भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून



खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असण्यासंदर्भात पोलीस यंत्रणेने या मागील कारणे शोधावीत, याबाबत अधिक खोलवर चौकशी करून गुन्ह्यांचा शोध घेत अहवाल सादर करावा. कुठेही खोटे गुन्हे असल्यास तपासाअंती ते दाखल करण्यात येऊ नयेत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणी दरम्यान खून, बलात्कार, दरोडे आदी गंभीर गुन्हे प्रकारातील साक्षीदारांचे संरक्षण करावे. त्यासाठी साक्षीदार संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करीत सरकारी वकिलांशी संवाद व समन्वय वाढविण्यात यावा. या कायद्याच्या अंमलबजावणी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणांची कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्याच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

## आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर मागे

### परिवहन मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहीती

अमरावती : गत आठवडाभरापासून सुरू असलेला राज्यातील मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर मागे घेण्यात आला असून, आज पासून राज्यभरातील आरटीओ कार्यालयांमधील कामकाज सुरळीतपणे सुरू होणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संघटनेच्या प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा करून प्रलंबित मागण्यांबाबत ओशासक भूमिका घेतल्याने हा तोडगा निघाला असल्याचे संघटनेने म्हटले आहे. आरटीओ कर्मचारी संघटनेने सेवा प्रवेश नियम, पदोन्नती, पदनाम बदल, सरळसेवा नियुक्ती, तसेच ओशासित प्रगती योजनेसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी १६ जूनपासून बेमुदत संप पुकारला होता. या संपामुळे राज्यातील वाहन नोंदणी, परवाना,



कर वसुली आणि इतर अनेक सेवा प्रभावित झाल्या होत्या. संपाच्या पोर्शभूमीवर राज्यातील अनेक आमदार व खासदारांनी परिवहन मंत्र्यांकडे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली होती. तसेच विविध माध्यमांतून या प्रश्नाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाल्याने शासनावरही निर्णय घेण्यासाठी दबाव वाढला होता. सोमवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी पदोन्नतीच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याचे तसेच इतर मागण्यांबाबत निश्चित कालमर्यादेत निर्णय घेण्याचे ओशासन देण्यात आले. परिवहन आयुक्त स्तरावरही प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी विशेष बैठक घेण्याचे ठरविण्यात आले आहे. शासनाकडून मिळालेल्या लेखी व तोंडी ओशासनांनंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संप स्थगित करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, संप मागे घेतल्यानंतर आरटीओ कार्यालयांतील कामकाज पूर्ववत सुरू होण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा प्राधान्याने करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळणार असून, विभागाच्या महसूल वसुलीलाही गती मिळणार आहे. संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागीय अध्यक्ष अनिल मानकर यांनी सांगितले की, शासनाने मागण्यांबाबत गांभीर्य दाखवून सकारात्मक चर्चा केल्याने आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. जनतेची गैरसोय टाळणे आणि विभागीय कामकाज पूर्वपदावर आणणे हे संघटनेचेही प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## ग्रामीण भागात कलम ३७ (१), (३) लागू

### कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी निर्णय

अमरावती : जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला आहे. तो २७ जूनच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

## जनआरोग्य योजनेवर फ्लाइंग स्कॉडची नजर

मुंबई : महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेतील गैरप्रकारांवर लगाम घालण्यासाठी राज्य सरकार विशेष फ्लाइंग स्कॉड स्थापन करणार आहे. तसेच रुग्णांना कोणत्या रुग्णालयात बेड उपलब्ध आहेत, याची माहिती मोबाईलवर मिळावी यासाठी रिअल-टाइम बेड उपलब्धता डॅशबोर्ड विकसित करण्यात येत असल्याची माहिती आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. आमदार डॉ. राहुल आहेर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना आबिटकर म्हणाले की, १ जुलै २०२४ ते २४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत एकाच मोबाईल क्रमांकावरून तब्बल १५ हजार ४०७ दावे नोंदविल्याची गंभीर अनियमितता समोर आली आहे. हा प्रकार प्रामुख्याने नाशिकमधील काही रुग्णालयांमध्ये घडला असून संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोषींना कोणतीही पाठीशी घातली जाणार नसून कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आरोग्यमंत्र्यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांत १९ रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्यात

## स्वाधार योजनेतील त्रुटी पूर्ण करण्यासाठी ७ जुलैपर्यंत मुदतवाढ

अमरावती : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रातील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी ७ जुलैपर्यंत त्रुटी दे पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, न बारावी, तसेच बारावीनंतरच्या न व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रातील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे. कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटी पूर्तता केलेली नाही. त्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी वशर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहणार आहे. तसेच १६ जून ते ७ जुलै या कालावधीत दुपारी ३ ते सायंकाळी ५ यावेळेत स्वतः उपस्थित राहून त्रुटी पूर्तता करून घेण्यासाठी साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले



गौरव प्रकाशन

अमरावती, दि. २ ते ८ जुलै २०२६



काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## गणवेश योजना

## विद्यार्थ्यांसाठी की ठेकेदारांसाठी?

*शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याची योजना ही केवळ एक शासकीय योजना नसून शिक्षणातील समानता, सामाजिक न्याय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना आधार देणारी महत्त्वाची योजना आहे. राज्य शासन या योजनेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश मिळावा, स्थानिक महिला बचत गटांना रोजगार मिळावा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, हा या योजनेमागील मूळ उद्देश आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र समोर येत आहे.*

*शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये गणवेश निर्मिती आणि पुरवठ्यासाठी महिला बचत गटांना प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. त्यामुळे ग्रामीण महिलांना रोजगार, आर्थिक स्वावलंबन आणि स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा आहे. परंतु अनेक भागांत बचत गटांची नावे केवळ कागदोपत्री वापरली जात असल्याचे आरोप होत आहेत. प्रत्यक्ष खरेदी, शिवणकाम आणि पुरवठा हे खासगी ठेकेदार, एजंट आणि मध्यस्थ यांच्या माध्यमातून होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे शासनाच्या मूळ उद्देशालाच तडा जात आहे.याहून गंभीर बाब म्हणजे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गणवेशाच्या गुणवत्तेबाबत सातत्याने तक्रारी समोर येत आहेत. अनेक पालकांनी कापड अत्यंत पातळ, कमी प्रतीचे आणि अल्पकाळ टिकणारे असल्याची नाराजी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी शिवणकाम निकृष्ट असल्याने गणवेश काही दिवसांतच फाटत असल्याच्या तक्रारी आहेत. मापांतील विसंगती, बटनांची खराब गुणवत्ता, रंग टिकत नसणे आणि कापडाचा दर्जा शासनाने निश्चित केलेल्या निकषांपेक्षा कमी असल्याचीही चर्चा आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण गणवेश देण्याचा उद्देश अपूर्णच राहतो.या योजनेत गुणवत्ता तपासणीची स्पष्ट व्यवस्था असतानाही निकृष्ट गणवेश विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचतात, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. गणवेशासाठी कापड खरेदी, नमुना मंजुरी, शिवणकाम, पुरवठा आणि अंतिम स्वीकार अशा प्रत्येक टप्प्यावर संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. तरीही गुणवत्तेच्या निकषांचे उल्लंघन होत असेल, तर तपासणी यंत्रणा प्रभावीपणे काम करत आहे का, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.शासन निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने व्हावा, ही प्रत्येक करदात्याची अपेक्षा आहे. मात्र, निविदा प्रक्रिया, पुरवठादारांची निवड, देयकांची मंजुरी आणि गुणवत्ता तपासणी या सर्व प्रक्रियांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या आरोपांमध्ये तथ्य असेल, तर हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून विद्यार्थ्यांच्या हक्कांवर गदा आणणारा प्रकार आहे.यामुळे शासनाने संपूर्ण गणवेश पुरवठा प्रक्रियेची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यात यादृच्छिक पद्धतीने गणवेशाच्या नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी व्हावी, गुणवत्ता अहवाल सार्वजनिक करावेत आणि दोषी पुरवठादार, ठेकेदार किंवा अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करावी. महिला बचत गटांच्या नावाचा गैरवापर होत असेल, तर तो तातडीने थांबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा गणवेश हा केवळ कपड्यांचा संच नसतो; तो समानतेचे, स्वाभिमानाचे आणि शिक्षणातील समतेचे प्रतीक असतो. शासनाच्या प्रत्येक रुपयाचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार स्वरूपात पोहोचला पाहिजे. अन्यथा ही योजना विद्यार्थ्यांच्या हिताची न राहता काही मोजक्या व्यक्तींच्या आर्थिक फायद्याचे साधन बनल्याची भावना अधिक बळावेल. म्हणूनच आता वेळ आली आहे ती केवळ चौकशीची नाही, तर संपूर्ण व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची.*

# महाकर्जमुक्तीचा महानिर्णय



शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे. या योजनेविषयी ही माहिती

शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे** :२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना** :१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ** : नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा** :महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुनर्गठन/फेरपुनर्गठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु.५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (जढड) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष** : पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.

**जमीन धारणेची अट नाही.**

पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत** :विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु.२५ हजार पेक्षा अधिक आहे. राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिकमासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# शहरातील अतिगर्दीच्या इमारतींच्या अग्निसुरक्षेवर महापौरांची महत्त्वपूर्ण बैठक

## शहरातील इमारतींच्या अग्निसुरक्षेचा अहवाल १५ दिवसांत सादर करण्याचे निर्देश



अमरावती : शहरातील अतिगर्दीच्या इमारतींमध्ये अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये आणि नागरिकांच्या जीविताची सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने आज बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी अमरावती महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शहरातील विविध प्रकारच्या सार्वजनिक इमारतींमधील अग्निशमन सुरक्षा उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान शहरातील खाजगी कोचिंग क्लासेस, शाळा, महाविद्यालये, मॉल, हॉटेल, बाजारपेठा, रुग्णालये, मंगल कार्यालये तसेच मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वदर्ळ असणाऱ्या इतर व्यावसायिक आणि सार्वजनिक इमारतींमध्ये अग्निसुरक्षा नियमांचे पालन कितपत केले जात आहे, यावर सखोल चर्चा करण्यात आली. अनेक ठिकाणी अग्निशमन यंत्रणा कार्यरत आहे का, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग उपलब्ध आहेत का, अग्निशमन यंत्रांची नियमित तपासणी केली जाते का, तसेच अग्निशमन विभागाकडून आवश्यक परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेण्यात आले आहे का, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना माहिती संकलित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. महापौर श्रीचंद तेजवानी यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट करत संबंधित विभागांनी अग्निसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करावे, असे निर्देश दिले. शहरातील सर्व गर्दीच्या इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करून त्यामधील अग्निशमन सुविधांची तपासणी करण्यात यावी आणि ज्या ठिकाणी त्रुटी आढळतील, त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, असेही त्यांनी सांगितले. महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून शहरातील गर्दीच्या इमारतींची अद्ययावत नोंदणी करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक इमारतीची अग्निसुरक्षा स्थिती, उपलब्ध यंत्रणा, सुरक्षाविषयक सुविधा आणि नियमांचे पालन यासंदर्भातील सविस्तर अहवाल तयार करून तो १५ दिवसांच्या आत महानगरपालिकेकडे सादर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. याचबरोबर शहरातील अतिगर्दीच्या इमारतींसाठी अग्निसुरक्षा संदर्भात प्रमाणित कार्यपद्धती (एस.ओ.पी.) तयार करण्याचेही निर्देश बैठकीत देण्यात आले. या एस.ओ.पी.मध्ये इमारतींमध्ये आवश्यक असलेल्या अग्निसुरक्षा सुविधांची किमान मानके, आपत्कालीन परिस्थितीत करावयाची कार्यवाही, जबाबदार अधिकाऱ्यांची कर्तव्ये, नियमित तपासणीची प्रक्रिया, अग्निशमन यंत्रणेची देखभाल, मॉक ड्रिलचे नियोजन तसेच नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतराची कार्यपद्धती यांचा समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत शहरातील सर्व सार्वजनिक व व्यावसायिक इमारतींचे वर्गीकरण करून त्यानुसार तपासणी मोहीम राबविण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

अग्निशमन विभाग, नगररचना विभाग आणि इतर संबंधित विभागांनी संयुक्तपणे सर्वेक्षण करून आवश्यक ती माहिती संकलित

## तिवसा शहरातील वीज प्रश्नी काँग्रेसचे महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन



तिवसा : तिवसा शहर व तालुक्यात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, नागरिकांना येणारी अवाजवी वीजबिले, स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती आणि अनेक दिवसांपासून रखडलेल्या लिंक लाईनच्या कामाविरोधात तिवसा तालुका काँग्रेस कमिटी, तिवसा शहर काँग्रेस कमिटी आणि नगरसेवकांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) उपकार्यकारी अभियंता व शहर अभियंता यांच्या दालनात बुधवारी आक्रमक ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधत चांगलेच धारेवर धरले. शहरात सातत्याने होणाऱ्या वीजखंडितीमुळे विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, लघुउद्योजक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असून आर्थिक नुकसानही सहन करावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला. याशिवाय, नागरिकांना अवाजवी वीजबिले पाठविण्यात येत असल्याने सर्वसामान्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. एकीकडे स्मार्ट मीटरची सक्ती केली जात असताना दुसरीकडे अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा देण्यात महावितरण अपयशी ठरल्याची टीका आंदोलनकर्त्यांनी केली. काही दिवसांपूर्वी ग्रामीण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी तिवसा शहरासाठी महत्त्वाच्या असलेल्या लिंक लाईनचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित कंत्राटदाराला दिले होते. मात्र, त्यानंतरही या कामाला गती न मिळाल्याने काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदाराच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी लिंक लाईनचे काम तातडीने पूर्ण करावे, वारंवार होणारी वीजखंडिती थांबवावी, अवाजवी वीजबिलांची चौकशी करून नागरिकांना दिलासा द्यावा तसेच स्मार्ट मीटरची सक्ती थांबवावी, अन्यथा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली यापेक्षाही तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# ४०० खाटांच्या नवीन डफरीन हॉस्पीटलमध्ये डॉक्टर -परिचारिकांची पदस्थापना कधी करणार ? : आ.सौ. सुलभाताई खोडके

मुंबई : अमरावती जिल्ह्यातील सर्वात मोठे प्रसुतालय असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) येथील वैद्यकीय डॉक्टर व परिचारिकांच्या रिक्त पदाचे ग्रहण आता लवकरच सुटणार आहे. या संदर्भात अमरावतीच्या आमदार - सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी सातत्याने विधानसभेत प्रश्न मांडून शासनाचे लक्ष वेधले असल्याने डफरीन मधील रिक्त डॉक्टर व परिचारिकांच्या पदस्थापनेबाबत बैठक बोलाविण्याची घोषणा आरोग्यमंत्री ना. प्रकाशजी आबिटकर यांनी राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातून केली आहे. अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात ग्रामीण भागापासून ते शहरी तसेच धारणी - मेळघाट व मध्यप्रदेशाच्या सीमाभागातून महिला प्रसूतीकरिता दाखल होतात.




या रुग्णालयात महिला रुग्णांची संख्या वाढत असल्याने नुकतेच वर्ष २०२४ मध्ये डफरीन रुग्णालयाची ४०० खाटांची नवीन इमारत साकारून आरोग्याच्या सर्व सुविधायुक्त रुग्णालय कार्यान्वित करण्यात आले. मात्र डॉक्टर व परिचारिकांच्या कमतरतेमुळे महिला रुग्णाचा एवढा मोठा डोलारा सांभाळतांना सद्यस्थितीतील आरोग्य यंत्रणेला कसरत करावी लागत लागत आहे.त्यामुळे डफरीन रुग्णालयात रिक्त डॉक्टर व परिचारिकांच्या पदस्थापनेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असता आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी यासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विधानसभेत सुद्धा मुद्दा उपस्थित केला. दरम्यान राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज बुधवार दिनांक ०१ जुलै २०२६ रोजीच्या प्रश्नोत्तरात आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी डफरीन रुग्णालयातील डॉक्टर व नर्स यांच्या पदस्थापनेसंदर्भात पुनरोच्चार केला. यावर सभागृहात उपस्थित राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री ना. प्रकाशजी आबिटकर यांनी जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावतीमधील रिक्त डॉक्टर व परिचारिकांच्या पदस्थापनेसंदर्भात बैठक लावण्याबाबतची घोषणा केली. तसेच डफरीन रुग्णालयात काही आवश्यक नवीन पदे प्रस्तावित करण्याबाबत सुद्धा बैठकीच्या माध्यमातून सकारात्मक कार्यवाही करणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितले. अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालय , जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये नागरिकांच्या सर्व सुविधांच्या अनुषंगाने सर्व उपाययोजना करण्याबाबतही मंत्री. ना.प्रकाश आबिटकर यांनी सभागृहातून विशास दर्शविला. आज बुधवार दिनांक १ जुलै २०२६ रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिवस असल्याने आरोग्य मंत्र्यांच्या बैठकीनंतर डफरीन हॉस्पिटलला मेडिकल स्टाफचे स्पेशल गिफ्ट मिळणार आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून डफरीन हॉस्पिटल मधील डॉक्टर व परिचारिकांच्या रिक्त पदांचे ग्रहण आता आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या पाठपुराव्याने सुटणार आहे.

# ग्रामीण दलातील १७ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

अमरावती : जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी मंगळवारी सायंकाळी ग्रामीण भागातील १७ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्थानीक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखेडे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर, त्यांना पोलीस कल्याण विभागाव्यतिरिक्त मुख्यालयातील पोलीस उपअधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. त्यांच्या सूत्रे आता सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अशोक लांडे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पोलीस कल्याण शाखेत कार्यरत असलेल्या आनंद पिदुरकर यांची नियुक्ती नांदगाव खांडेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. धारणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार अवतार सिंग चव्हाण यांची नियुक्ती अचलपूर येथे, चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे ठाणेदार अजय अखेरे यांची नियुक्ती परतवाडा येथे आणि जिल्हा विशेष शाखेचे आधार सिंग सोनोने यांची नियुक्ती चांदूर बाजार वाचक शाखेचे गौतम इंगळे यांची सरमसपुरा ठाण्यात बदली करण्यात आली आहे. चांदूर बाजार ठाण्याचे ठाणेदार अशोक जाधव आता वरुड ठाण्याची सूत्रे सांभाळणार आहेत. परतवाडाचे ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्यावर चांदूर रेल्वे, अचलपूरचे ठाणेदार गजानन मेहत्रे यांच्यावर दत्तापुर, आर्थिक गुन्हे शागेचे अजीत राठोड यांच्याकडे दर्यापुर, नियंत्रण कक्षाचे शेषराव नितनवरे यांना धारणी, सायबर पोलीस ठाण्याचे अशोक लांडे यांना स्थानीक गुन्हे शाखेची जबाबदारी देण्यात आली आहे. नियंत्रण कक्षाचे सतीश पाटील यांना विशेष शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विशेष नियंत्रण कक्षाचे संजय शिरभहाते यांच्याकडे बेलोरा विमानतळ सुरक्षेचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या किरण वानखेडे यांच्याकडे कल्याण शाखा आणि मुख्यालयाच्या उपअधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार राहणार आहे. बेलोरा विमानतळ सुरक्षा विभागातील संतोष दाबराव यांच्याकडे नियंत्रण कक्षाची जबाबदारी राहणार असून नियंत्रण कक्षातील प्रियंका तुंडुरवार यांच्याकडे भरोसा सेलची जबाबदारी आणि नियंत्रण कक्ष निरीक्षक दिनेश चव्हाण यांच्याकडे आर्थिक गुन्हे शाखेची जबाबदारी देण्यात आली आहे. अशाप्रकारे, ग्रामीण भागातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत असलेल्या एकूण १७ निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

# विदर्भ खाटीक समाज सेवा समितीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## विद्यार्थ्यांनो तुमच्यामध्ये टॅलेंट आहे, मोठे स्वप्न बघा : आ.गजानन लवटे



अमरावती : आयुष्यात काही साध्य करायचे असेल तर ते मिळविण्यासाठी जिद्दीने प्रयत्न केले पाहिजे. स्वप्नसुद्धा मोठीच बघितली पाहिजे, असे आवाहन दर्यापूर-अंजनगावसुर्जी मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे यांनी केले. विदर्भ खाटीक समाज सेवा समितीतर्फे इयत्ता दहावी व बारावीचे गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. स्थानिक यशोदानगरस्थित सखा मंगलम येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष सुधीरराव लसनकर तर प्रमुख अतिथी म्हणून माजी अधिष्ठाता डॉ. के. वाय. विल्हेकर, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलंगे, करियर मार्गदर्शक दिलीप सोळंके, मायक्रोसॉफ्टचे वरिष्ठ सॉफ्टवेअर इंजिनिअर अजय माकोडे, शिवसेना नेते बबनराव विल्हेकर यावेळी उपस्थित होते. आज शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रगती करीत आहे. समाजातील युवक-युवतींमध्ये गुणवत्ता आहे. ते शासकीय नोकरीत मोठी पदे भूषवित आहेत, ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे. मुलांना ज्या क्षेत्राची आवड आहे, त्याच क्षेत्रात त्यांनी करिअर करावे, पालकांनी स्वतःची मर्जी पाल्यांवर लादू नये, समाजजीवनात वावरताना प्रामाणिकपणा जपला पाहिजे, असेही आमदार गजानन लवटे म्हणाले.

तत्पूर्वी, संत गाडगेबाबा व सावित्रीबाई फुले यांच्या फोटोंना माल्यार्पण व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता दहावी व बारावीत ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा पाहुण्यांच्या हस्ते गुणगौरव तसेच बी. डी. एस. पदवी प्राप्त प्राची जितेंद्र रावेकर (नागपूर), अभियांत्रिकेची परीक्षा उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण करणाऱ्या कुणाल प्रमोद हरणे, आयआयएमद्वारे एमबीएच्या अभ्यासक्रमासाठी निवड झालेले वेदांत राऊळकर (नागपूर), अमित अविनाशराव हिरेकर, इंडियन नॅशनल फॅशन फेस्टिव्हल अवॉर्ड योजने अंतर्गत रनवे मॉडेल म्हणून उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कृत करण्यात आलेली पुष्करा अरविंद मदने (काटोल), पीएचडीप्राप्त डॉ. स्वप्नील विजयराव मंडवे (येवदा), डॉ. योगेश सुभाषराव कंटाळे, डॉ. मिनल अरविंद घोलपे, डॉ. सौरभ विनायकराव लवाटे, अक्षय राजाभाऊ लोयटे यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, मोमेन्टो व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच अचलपूर येथील समाज बांधव गणेशराव नामदेवराव लवटे यांनी समितीतर्फे सभागृह बांधकामासाठी ५१ हजारांची देणगी दिल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे दिलीप सोळंके, रोहन पलंगे, डॉ. के. वाय. विल्हेकर, इंजि. अजय माकोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समिती अध्यक्ष सुधीर लसनकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सचिव तथा कार्यकारिणी सदस्य गोपाल हरणे यांनी, प्रास्ताविक सचिव राजाभाऊ लोयटे यांनी केले.

अविनाश हिरेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसह नागपूर, काटोल, अकोला, यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. विदर्भ खाटीक समाजाचे सर्व कार्यकारिणी सदस्य, सल्लागार, विशेष निमंत्रित, यंग ब्रिगेड व समितीच्या महिला प्रतिनिधी ह्यांनी हा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## टाकरखेडा शंभू ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत पार

टाकरखेडा शंभू : टाकरखेडा शंभू ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत मंगळवारी (१० जून २०२६) पार पडली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सोडतीनुसार प्रभाग क्रमांक १ मधील तीन सदस्यांच्या जागांपैकी एक जागा सर्वसाधारण महिला, एक जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) आणि एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक २ मधील तीन जागांपैकी दोन जागा सर्वसाधारण महिला तर एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आली आहे.

TRiLOGiC
COMPUTERS & SERVICES
Cell no. : 08928399966, 09764399966

# नैसर्गिक व तंत्रज्ञानाधारित शेतीत महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## राज्यस्तरीय कृषी पुरस्कार २०२३-२४ चे वितरण



मुंबई : दिवंगत वसंतराव नाईक यांनी शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. सत्तरच्या दशकात महाराष्ट्र भीषण दुष्काळाचा सामना करत असताना त्यांनी कृषी क्षेत्राला नवी दिशा दिली. राज्यात कृषी विद्यापीठांच्या स्थापनेत त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे कृषी विभागातर्फे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै या कृषि दिनानिमित्त आयोजित कृषि पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे यासह राज्यातील कृषि पुरस्कार विजेते उपस्थित होते.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार २०२३ कोल्हापुर विभाग मधून मु.पो.तळसंदे, ता.हातकणंगले, येथील डॉ.संजय ज्ञानदेव पाटील यांना तर २०२४ चा ठाणे विभागातून जि.पालघर, ता. तलासरी, मु.पो.ब्राम्हणगाव (झाई बोरीगाव) येथील यज्ञेश वसंत सावे यांना तीन लाखांचे पारितोषिक व सन्मानपत्र वितरण करण्यात आले. कृषि विभागात प्रातिनिधीक स्वरूपात लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.राज्यपाल वर्मा म्हणाले की, भारताची संस्कृती, परंपरा आणि समृद्धीचा पाया शेतकरी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेकदा शेतकऱ्यांचे कल्याण ही केंद्र सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, पीक विमा योजना आणि किसान क्रेडिट कार्ड यांसारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा मिळत असून पशुपालक आणि मत्स्यव्यवसायिकांनाही कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होत आहे.'बीज ते बाजार' ही संकल्पना शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रभावी ठरत आहे.राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा आरोग्य पत्रिका आणि नैसर्गिक खतांचा वापर यासारख्या उपक्रमांमुळे कृषी उत्पादकतेत वाढ होत आहे. राज्य शासनाने शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित, हवामान अनुकूल आणि बाजारपेठाभिमुख करण्यासाठी अनेक परिवर्तनशील उपक्रम हाती घेतले आहेत. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत शेततळी, शेततळ्यांचे अस्तरीकरण आणि विविध जलसाठा संरचनांची मोठ्या प्रमाणावर उभारणी करण्यात आली आहे. हजारो शेततळी पूर्ण झाली असून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट आर्थिक सहाय्य जमा करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देणे आणि शाश्वत शेतीला चालना देणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र नैसर्गिक शेतीच्या क्षेत्रात देशासाठी आदर्श ठरू शकतो. नैसर्गिक शेतीमुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल, तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि समृद्धीही वाढेल. यासोबतच देशी गोवंशाचे संवर्धन आणि संरक्षण यावरही विशेष भर देण्याची गरज आहे. गोआधारित जैविक घटक नैसर्गिक शेतीचा महत्त्वाचा आधार असल्याचे राज्यपाल वर्मा यांनी सांगितले.

**पुढील पिढीला दुष्काळाची झळ बसू देणार नाही :**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि फायदेशीर करण्यासाठी जलसंधारण, सौर कृषी पंप, दिवसा मोफत वीज, कृषी यांत्रिकीकरण, प्रमाणित बियाणे, सिंचन सुविधा आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार अशा विविध योजनांद्वारे राज्य शासन सातत्याने काम करत असून, महाराष्ट्राच्या पुढील पिढीला दुष्काळाची झळ बसू देणार नाही. राज्यात जलयुक्त शिवार अभियान आणि शेततळे योजनेच्या माध्यमातून २२ हजारांहून अधिक गावांमध्ये जलसंधारणाची व्यापक कामे करण्यात आली आहेत.

## 'स्पाय' उपकरणांच्या गैरवापराला लागणार लगाम; राज्य सरकार स्थापन करणार विशेष समिती


**डॉ. नितीन राऊत यांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर राज्य सरकारची ग्वाही**




नागपूर : बाजारात सहज उपलब्ध असलेल्या 'स्पाय' (हेरगिरी करणाऱ्या) उपकरणांमुळे सामान्य नागरिकांच्या, विशेषतः महिलांच्या गोपनीयतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या उपकरणांच्या अनियंत्रित विक्रीवर आणि त्यांच्या संभाव्य गैरवापराला आळा घालण्यासाठी राज्य सरकार जागे झाले आहे. यासंदर्भात माजी मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या मुद्द्यांची दखल घेत, अशा उपकरणांच्या नियमनासाठी विशेष तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा राज्यमंत्री योगेश कदम यांनी केली.

पावसाळी अधिवेशनादरम्यान या विषयावर प्रश्न उपस्थित करताना डॉ. नितीन राऊत यांनी प्रशासकीय उदासीनतेवर जोरदार टीका केली. डॉ. राऊत म्हणाले, बाजारात ही स्पाय उपकरणे सर्रास विक्रीला उपलब्ध आहेत आणि त्यांचा वापर करून महिलांच्या गोपनीयतेचा भंग होत आहे. हा अत्यंत संवेदनशील विषय असूनही शासन केवळ वेळकाढू धोरण अवलंबत आहे. केवळ कागदी सूचना देऊन हा धोका टाळता येणार नाही, तर या उपकरणांच्या विक्रीवर कडक बंदी आणि देखरेख असणे आवश्यक आहे. प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटींमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कसा ऐरणीवर आला आहे, हे डॉ. राऊत यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.डॉ. नितीन राऊत यांनी मांडलेल्या या गंभीर मुद्द्याची दखल घेत राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, तंत्रज्ञानाचा वापर करताना एक 'थिन लाईन' असणे गरजेचे आहे. स्पाय उपकरणांच्या नियमनासाठी आम्ही एक तज्ज्ञ समिती गठीत करत आहोत. येत्या ३० दिवसांच्या आत ही समिती स्थापन केली जाईल आणि सहा महिन्यांच्या कालावधीत समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर केंद्राकडे कडक कायदे करण्याबाबत पाठपुरावा केला जाईल.

मंत्रालयातील किंवा अन्य संवेदनशील ठिकाणची माहिती लीक झाल्यास संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासनही मंत्र्यांनी दिले. डॉ. राऊत यांच्या आक्रमक मागणीनंतर सरकारने घेतलेली ही भूमिका महिलांच्या गोपनीयतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.




गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com. (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)